




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार २२ नोव्हेंबर २०२४ | अंक ३४८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# मुंबई, कोकण, मराठवाडा, खान्देश, विदर्भ, महायुती की मविआ, कोण जास्त जागा जिंकणार?




विधानसभा निवडणुकीसाठी विविध संस्थांचे एक्झिट पोल समोर येत आहेत. Axis My India चा एक्झिट पोल समोर आला आहे. Axis चा 226 जागांचा एक्झिट पोल समोर आला आहे. या पोलनुसार, राज्यात महायुती एकहाती सरकार स्थापन करु शकतं. राज्यात महायुतीला 150 जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. या पोलनुसार, महायुतीला राज्यात स्पष्ट बहुमत मिळणार आहे. या पोलकडून विभागनिहाय एक्झिट पोलची आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. पण तरीदेखील विदर्भाची आकडेवारी अजून जाहीर करण्यात आलेली नाही. तरीही मुंबई शहर, ठाणे आणि कोकण, खान्देश, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या 5 विभागांचा एक्झिट पोल जाहीर करण्यात आला आहे.

## मराठवाड्याचा एक्झिट पोल काय?

Axis My India या संस्थेकडून प्रांतनिहाय एक्झिट पोलची आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. या पोलनुसार, मराठवाड्यात एकूण 46 विधानसभेच्या जागा आहेत. यापैकी 30 जागांवर महायुतीला यश मिळणार आहे. तर महाविकास आघाडीला केवळ 15 जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. तर एका जागेवर अपक्ष किंवा बंडखोर जिंकून येण्याची शक्यता आहे.

## पश्चिम महाराष्ट्रात कुणाच्या जास्त जागा?

विशेष म्हणजे Axis My India कडून पश्चिम महाराष्ट्राचा देखील पोल जाहीर करण्यात आला आहे. या पोलनुसार, पश्चिम महाराष्ट्रात 36 जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीला 21 जागांवर यश मिळण्याची शक्यता आहेत. तर इतरांना 1 जागावर यश मिळू शकतं.

## खान्देशाचा एक्झिट पोल काय?

Axis च्या पोलनुसार, उत्तर महाराष्ट्र म्हणजेच खान्देशात विधानसभेच्या एकूण 47 जागा आहेत. यापैकी सर्वाधित जागांवर महायुतीचे उमेदवार जिंकून येतील, असा दावा पोलच्या आकडेवारीनुसार करण्यात आला आहे. पोलच्या आकड्यांनुसार, महायुतीला तब्बल 38 जागांवर यश येईल. तर महाविकास आघाडीला केवळ 7 जागांवर यश मिळवता येईल. तर अपक्षांना 2 जागांवर यश मिळेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे

## कोकण आणि ठाण्याचा एक्झिट पोल काय?

विशेष म्हणजे कोकण आणि ठाण्याचा देखील एक्झिट पोल ॲक्सिसकडून जाहीर करण्यात आला आहे. पोलनुसार, कोकण आणि ठाण्यात महायुती आणि महाविकास आघाडीत टफ फाईट होण्याची शक्यता आहे. या भागात महायुतीला 24 तर महाविकास आघाडीला 23 जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. तर इतरांना 2 ठिकाणी यश मिळू शकतं.

# ठाकर आडगावात उभारले तीन वनराई बंधारे

## पाणी आडवा, पाणी जिरवा ; कृषी मित्र बाबू कोकाट यांचा पुढाकार

गेवराई :

गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव, बेलगुडवाडी तसेच कोलतेवाडी शिवारात ठाकर आडगाव येथील कृषी मित्र बाबू कोकाट यांच्या पुढाकाराने तीन गावांच्या शिवारातून जाणाऱ्या नदीवर जवळपास ५० ते ६० गोण्यांचा वापर करुन २० फुट लांबीचे तीन बंधारे उभारण्यात आले आहेत. या बंधाऱ्यात साचलेल्या पाण्याचा वापर शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात पेरलेल्या पिकांना पाणी देण्यासाठी तसेच जनावरांना पिण्यासाठी पाणी म्हणून करता येणार आहे. पाणी आडवा, पाणी जिरवाङ्ग या मोहिमेला साथ देत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, गेवराई तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते, तसेच जातेगाव मंडळ अधिकारी मस्के, कृषी पर्यवेक्षक पवार, पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी मित्र बाबू कोकाट यांनी ठाकर आडगाव, कोलतेवाडी, बेलगुडवाडी या तीन गावांच्या शिवारातून जाणाऱ्या नदीवर शेतकरी बांधवांच्या सहकार्याने स्वतः श्रमदानातून साखळी पद्धतीने तीन वनराई बंधारे उभारले आहेत. या वनराई बंधाऱ्यामुळे जमिनीत पाणी मुरुन भविष्यात आसपासच्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामात पेरलेल्या पिकांना पाणी देण्यासाठी तसेच जनावरांना पिण्यासाठी पाणी म्हणून फायदा होणार आहे. तर वनराई बंधारे उभारण्यासाठी कृषी मित्र बाबू कोकाट, तुकाराम कोकाट, बापूराव कोकाट, चंद्रकांत जाधव या शेतकरी बांधवांनी परिश्रम घेतले आहेत.




# अँड.स्वप्निल गलधर यांची शिवसेना ( शिंदे गट) पक्षाच्या

## बीड जिल्हा प्रमुखपदी निवडीचे लिंबागणेश येथे आतिशबाजीने जल्लोषात स्वागत

लिंबागणेश:- ( दि.२१ ) शिवसेना मुख्य नेते माननीय एकनाथजी शिंदे ( मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या जिल्हा प्रमुखपदी (कार्यक्षेत्र आष्टी/ पाटोदा / गेवराई विधानसभा ) नियुक्ती शिवसेना सचिव संजय पुष्पलता भाऊराव मोरे यांच्या स्वाक्षरीने करण्यात आली असुन वंदनीय हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण यांचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास व्यक्त केला आहे. आज सायंकाळी लिंबागणेश येथे अँड, स्वप्निल गलधर यांची शिवसेना जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल स्व.अमोलभैय्या गलधर युवा मंच लिंबागणेश यांच्या वतीने गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर शिवतीर्थ लिंबागणेश याठिकाणी आतिषबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.यावेळी एकच भैय्या, स्वप्निल भैय्याङ्ग घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, सचिन आगवान,सुरज कदम,करण वायभट,पप्पु अवसरे, अशोक थोरात, हनुमंत थोरात, गणेश तावरे, ओंकार पवार, बालाजी निर्मळ,बबलु आबदार, अशोक कांबळे, योगेश शिंदे, विक्की जाधव,कीरण थोरात, अक्षय थोरात, आप्पा थोरात आदी उपस्थित होते





# या लढाईत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचे आभार - डॉ. ज्योती मेटे

बीड (प्रतिनिधी) बीड विधानसभा निवडणुकीसाठी दी. २० रोजी मतदान प्रक्रिया पार पडली गेली पंधरा दिवस प्रचाराचे धामधूम सुरू होती. या सर्व कार्यकाळात शिवसंग्राम चे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी त्याचबरोबर लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणारे असंख्य चाहते, हितचिंतक यांचे डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आभार मानले आहेत.

नुकतेच विधानसभेसाठी मतदान झाले असून गेली पंधरा दिवस प्रचाराची धामधूम सुरू होती. या प्रचार यंत्रणेत शिवसंग्रामच्या मावळ्यांनी मोलाची साथ दिली त्याचबरोबर मुंबई, रायगड, ठाणे, रिसोड, वाशिम, पंढरपूर, इंदापूर सह महाराष्ट्रभरातील शिवसंग्राम चे मावळे या ठिकाणी माझ्या प्रचारासाठी आले आणि रात्रंदिवस मेहनत घेतली. तसेच बीड मधील मतदाराने या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अतिशय मायेने माझं स्वागत केलं या प्रेमाने मी अतिशय भारावून गेलेली आहे. मी बालाघाटची सून आहे या बीडकरांच्या प्रेमाचा, भावनेचा बंद यापुढील काळामध्ये पक्ष किंवा राजकारणाच्या पलीकडे जाऊन जपण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न असेल ,आपण दिलेल्या स्नेहामुळे माझी पुढची वाटचाल करण्यासाठी मला प्रेरणा मिळाली आहे. तेव्हा या लढाईत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचे मी आभार व्यक्त करते असे डॉ. ज्योती मेटे यांनी म्हटले आहे.



# आष्टी मतदारसंघाची १४ टेबलवर होणार मतमोजणी

## ३०० कर्मचारी नियुक्त; एकूण ३२ फे-यांमध्ये होणार चित्र स्पष्ट

आष्टी प्रतिनिधी :-आष्टी विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी शनिवारी (दि. २३) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. १४ टेबलवर ही मतमोजणी होणार असून एकूण ३२ फे-यांमध्ये चित्र स्पष्ट होणार आहे. यासाठी जवळपास ३०० कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी नजमा शेख यांनी दिली. विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (दि. २०) मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर आता सर्वांनाच निवडणुकीच्या निकालाचे वेध लागले आहेत. आष्टी मतदारसंघात प्रथमच चौरंगी लढत होत असून राजकीय स्तरावर विविध लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मतांची आकडेवारी करण्यात व्यस्त आहेत. तर प्रशासनाकडून निवडणुकीच्या मतमोजणी व निकालाची तयारी जोरात सुरू असल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने तहसील कार्यालय व मतमोजणी होत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये जय्यत तयारी सुरू आहे. आष्टी मतदारसंघात ४४० मतदान केंद्रे असून यासाठी एकूण एकूण १४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. शनिवारी (दि. २३) सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणी सुरु होईल. एका फेरीत १४ केंद्रांची मतमोजणी होणार आहे. एकूण ३२ फे-यांमध्ये मतमोजणी पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी ३०० कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक मतमोजणी कालावधीत सुरक्षा यंत्रणा कडेकोट ठेवण्यात येणार आहे. दुपारी चार वाजेपर्यंत आष्टी मतदारसंघाचा निकाल स्पष्ट होणार आहे.

# मतमोजणी कर्मचा-यांचे सरमिसळीकरण पूर्ण

बीड, दि. 21 : जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या मतमोजणी कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात निवडणूक निरीक्षक, राजकीय पक्षाचेप्रतिनिधीयांच्याउपस्थितीतपारपडले. जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात नियुक्त करण्यात आलेल्या मतमोजणी पर्यवेक्षक, सहायक आणि सुक्ष्म निरीक्षक यांचे रॅन्डमायझेशन (सरमिसळीकरण) झाले. ही प्रक्रिया गेवराई, माजलगावच्या निवडणूक निरीक्षक लालटनपुई वॉंगचॉंग, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक, प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, केज विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक वजाळे यांच्या उपस्थितीत पार पडली. तर ऑनलाईन माध्यमातून केज व परळी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक सुनील अंचिपका उपस्थित होते. यावेळी सहाही मतदारसंघातील प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व उमेदवारही उपस्थित होते. या प्रक्रियेचे अवलोकन त्यांनी केले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांना सविस्तर माहिती दिली. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व उमेदवार यांनीही या प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत समाधान व्यक्त केले. ही प्रकिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी भाऊसाहेब बांगर यांनी परिश्रम घेतले.

****



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २२ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# शिर्डीच्या साईबाबांचे अवतार?

शिर्डीच्या साईबाबांचे अवतार मानले जाणारे सत्य साई बाबा यांची यंदा ९७वी जयंती आहे. त्या निमित्त पुट्टपर्थीमध्ये उत्साहपूर्ण रंगतो सोहळा. जाणून घ्या त्यांना का म्हणतात शिर्डीच्या साईबाबाचा अवतार? त्यांच्या जयंती निमित्त त्यांच्या आयुष्याशी निगडित काही खास गोष्टी आपण बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजीं यांच्या लेखणीतून पाहणार आहोत... संपादक.

शिर्डीच्या साईबाबांचे अवतार मानले जाणारे सत्य साईबाबा यांची यंदा ९६वी जयंती आहे. दि.२३ नोव्हेंबर १९२६ रोजी त्यांचा पुट्टपर्थी या शहरात जन्म झाला. दरवर्षी त्यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्त पुट्टपर्थी शहरात तसेच जगभरातील अनेक ठिकाणी त्यांचे भक्त हा आनंद साजरा करतात. यंदा सुद्धा पारंपरिक रथोत्सव आणि वीणा पठण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असेलच. २३ नोव्हेंबर रोजी या कार्यक्रमाचा समारोप मंत्री महोदयांच्या हस्ते होत असतो. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी स्वतःला साईबाबांचे अवतार म्हणून घोषित केले होते. त्यानंतर आपल्या अनुयायांचा मोठा वर्ग निर्माण करून त्यांनाही हाच विश्वास पटवून दिला होता. आपल्या हयातीत त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात भरीव कार्य करून जगातील १२६ देशांमध्ये बाराशे सत्य साईबाबा केंद्र स्थापन करण्याचे मोठे काम केले आहे.

सत्य साईबाबा यांनी आपल्या हयातीत अनेक चमत्कार केल्याचे म्हंटले जाते. म्हणूनच त्यांना काही वेळा सुपर ह्युमन म्हणून देखील संबोधले जात होते. लोकांमध्ये फिरताना आपले चमत्कार दाखवत. कधी बहुमूल्य हार, अंगठी, दागिने किंवा अंगारा असे सगळे जादुई पद्धतीने प्रस्तुत करणे अनेकदा चर्चेच्या गर्तेत आले होते. यावरूनच त्यांना टीकेचा देखील सामना करावा लागला होता. सन १९४४मध्ये सत्य साईबाबा यांनी पुट्टपर्थी येथील गावकऱ्यांसाठी एका मंदिराची उभारणी केली. आध्यात्मिक बाबींच्या सोबतच सामाजिक कार्यात देखील सत्य साई बाबांचा मोलाचा वाटा होता. मोफत हॉस्पिटल, क्लिनिक, पाणपोई, ऑडिटोरियम, आश्रम, शाळा इत्यादींची बांधणी करून त्यांचा गोरगरिबांना वापर करायला दिला. त्यामुळे अनेकदा त्यांना देवाचे रूप मानले जात होते.

सत्य साईबाबा यांचे मूळनाव सत्यनारायण राजू असे असून सन १९२६ साली पुट्टपर्थी येथील एका गरीब हिंदू घरात त्यांचा जन्म झाला होता. आई- वडील, तीन भाऊ आणि दोन बहिणी असा त्यांचा परिवार होता. लोकांच्या म्हणण्यानुसार सत्य साईबाबा यांचा जन्म ढेकळली चमत्कारिक वातावरणात झाला होता. त्यांच्या जन्माच्या वेळी अचानक घरात वाद्य वाजू लागली होती. जेव्हा सत्यनारायण हे तेरा वर्षाचे होते तेव्हा एका विंचवाने त्यांना दंश केला होता. त्यानंतर काही तास ते पूर्णतः कोमात होते. काही तासांनी त्यांना शुद्ध आली. तेव्हा मात्र त्यांचे वर्तन पूर्णतः बदलले होते. त्यांनी अचानक संस्कृतमध्ये गाणी गाण्यास सुरुवात केली. तर त्यांचे शरीरही आधीपेक्षा किंचित अधिक कठोर झाले होते. या प्रकरणात त्यांच्यावर उपचार करण्यात स्थानिक डॉक्टरांना देखील यश आले नाही, असे म्हटले जाते. या घटनेनंतर एके दिवशी त्यांनी चॉकलेट आणि गुलाबाची फुले अशा भेटवस्तू बनवून वाटण्यास सुरुवात केली. त्यामुळे यामागील कारण त्यांना विचारण्यात आले. त्यांनी आपण साईबाबांचे अवतार असल्याचे सर्वांना सांगितले. तसेच त्याच क्षणी स्वतःच्या नावापुढे त्यांनी साई हा शब्द देखील जोडून घेतला. लोकांच्या विचारसरणीत सनातन धर्माची विचारधारा समाविष्ट करण्यात त्यांना यश आले होते.

इ.स.१९६३मध्ये सत्य साईबाबा यांना तब्बल चार वेळा हृदयविकाराचे झटके आले होते. मात्र काही काळाने त्यांच्या प्रकृतीमध्ये स्थैर्य आले होते. यानंतर त्यांनी एका प्रवचनातून आपला मृत्यू झाला तरी कर्नाटकात आपण प्रेमा साईंबाबा यांच्या रूपात पुन्हा जन्म घेऊ, असा दावा केला होता. सन २०११ साली मार्चमध्ये सत्य साईबाबा यांना श्वसनात त्रास होऊ लागल्यावर पुट्टपर्थी येथील शांतिग्राम श्री सत्य साई सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले होते. यानंतर एकाच महिन्यात त्यांची अवस्था आणखीच बिकट झाली. ते दि.२४ एप्रिल २०११ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी अनंतात विलीन झाले. !! पावन जयंती पर्वावर त्यांना विनम्र अभिवादन !!

- संत चरणधूळ: बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
(संतसाहित्य व संतचरित्रांचे गाढे अभ्यासक.)
मु. पो. ता. जि. गडचिरोली.
व्हा. नं. ७४१४९८३३३९.
इमेल- krishnadas.nirankari@gmail.com

# श्रीक्षेत्र दत्तधाम सारडगाव येथे श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवसीय कीर्तन महोत्सव !

## सोहळ्याला बद्रिनाथहून जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यासह संत महंत राहणार उपस्थित

परळी वैजनाथ, प्रतिनिधी.....

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग वैद्यनाथाच्या पावन पंचक्रोशीत निर्माण होत असलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम (अध्यात्मिक उन्नती केंद्र), गोपाळपुरा, सारडगांव, परळी-धर्मापुरी रोड, परळी वैजनाथ, जि. बीड येथे श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य दिव्य सोहळ्याला बद्रिनाथहून जगद्गुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यासह संत महंत उपस्थित राहणार आहेत.

ह.भ.प. विद्यावाचस्पती डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (निर्माणकर्ते श्री. दत्तधाम, अध्यामिक उन्नती केंद्र) यांनी या सोहळ्याबाबत सविस्तर माहिती दिली. मार्गशीर्ष प्रतिपदा, सोमबार दि. २ डिसेंबर २०२४ ते मार्गशीर्ष शुक्ल विनायक चतुर्थी, गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ या चार दिवसीय कालावधीत हा अध्यात्मिक सोहळा होणार आहे.श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग होणार असुन यज्ञाचार्य: पूज्यनीय पं. राजराजेश्वर दीक्षित (ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग पुजारी, म.प्र.) हे असणार आहेत. 'परमाराध्य' परमधर्माधीश उत्तरामनाय ज्योतीष्पीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती '१००८' (ज्योतिर्मठ, बद्रिनाथ, उत्तरांचल) यांच्या शुभहस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा तर कलशारोहण सोहळ्याला प.पू. महामंडलेश्वर स्वामी देवेंद्रानंदगिरी (अध्यक्षः वेदांत आश्रम, बहादूरगड, उपाध्यक्षः अखिल भारतीय संत्र समिती), ह.भ.प. मारोतीबाबा कुरेकर (माजी अध्यक्ष जोग महाराज वारकरी शिक्षम संस्था, आळंदी),प.पू. वेदांताचार्य विद्यावाचस्पती डॉ. माणिकशास्त्री मुखेकर (वाराणसी, आळंदी) उपस्थित राहणार



आहेत.या सोहळ्यास ना. धनंजय मुंडे, आ. पंकजाताई मुंडे,राहुल भैय्या कराड साहेब (मा. कार्यकारी अध्यक्ष माईर्स एमआयटी पुणे) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे तसेच भागवतराव कराड (माजी केंद्रीय अर्थ राजयमंत्री), मा. आ.चंद्रकांत सोनवणे (चोपडा, जळगांव ), संजय दौड माजी विधान परिषद सदस्य,बुधाजी पानसरे उद्योजक, नाशिक यांच प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या संपूर्ण सोहळ्यास विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथराव कराड (संस्थापक- अध्यक्ष, माईर्स एम्. आय. टी., पुणे) यांची प्रेरणा असुन ह.भ.प.डॉ. नामदेवशास्त्री सानप महाराज (श्री क्षेत्र भगवानगड) हे आशिर्वादपर सदिच्छा भेट देणार आहेत. न.प.गटनेते वाल्मिक अण्णा कराड यांचे या सोहळ्यास विशेष सहकार्य लाभणार आहे. व्यवस्थापक समस्त ग्रामस्थ मंडळी, सारडगांव, नंदनज हे आहेत.

### वाल्मिक अण्णा कराड यांचे विशेष सहकार्य

श्रीक्षेत्र दत्तधाम सारडगाव येथे श्री. दत्तात्रेय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवस कीर्तन महोत्सवास मा. ना.धनंजय मुंडे साहेब व नगरपरिषद गटनेते वाल्मीक आणा कराड यांची विशेष सहकार्य लाभले आहे.

### • चार दिवसीय कीर्तन महोत्सव...

या सोहळ्यात चार दिवसीय कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला असुन महाराष्ट्रातील ख्यातनाम व जेष्ठ श्रेष्ठ किर्तनकार किर्तनसेवा करणार आहेत. यामध्ये व्याकरणाचार्य: ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, महंत ह.भ.प. राधाताई सानप (आईसाहेब) (श्री क्षेत्र मीराबाई संस्थान, पाटोदा),ह.भ.प. बापूसाहेब मोरे महाराज (जगद्गुरू तुकोबारायांचे वंशज - श्री क्षेत्र पंढरपूर) तर काल्याचे कीर्तन विद्यावाचस्पती ह.भ.प. डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (नंदनज, ह. मु. नाशिक) यांचे होणार आहे. या महोत्सवात वारकरी संप्रदायातील गुणवान किर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक, भजनी मंडळी आदी आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

सोमवार, दि. २ डिसेंबर ते गुरुवार, दि. ५ डिसेंबर २०२४ प्रणप्रतिष्ठा सोहळा व दत्तयाग विधी,भजन, कीर्तन ,श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व कीर्तन महोत्सव सोहळ्याचा व अध्यात्मिक पर्वणीचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प. विद्यावाचस्पती डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (निर्माणकर्ते श्री. दत्तधाम, अध्यामिक उन्नती केंद्र) यांनी केले आहे.

# बीड जिल्ह्यात ६८.८८ टक्के मतदारांनी बजाविला हक्क

सहाही मतदारसंघात २३ नोव्हेंबर रोजी होणार मतमोजणी

बीड, दि. २१ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील २२ लाख २७ हजार ८४४ मतदारांपैकी १५ लाख ३४ हजार ४३६ म्हणजेच ६८.८८ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बुधवारी (ता.२०) बजाविला. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघातील मतदानांची मोजणी शनिवारी (ता.२३) होणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी सांगितले.

गेवराई मतदारसंघात ७२.७२ टक्के, माजलगाव ६७.२४, बीड ६२.१८, आष्टी ७३.०५, केज ६३.४८ आणि परळी मतदारसंघामध्ये ७५.२७ टक्के मतदान झाले. जिल्ह्यात सर्वाधिक मतदान परळी विधानसभा मतदारसंघात झाले.

गेवराई मतदारसंघात एक लक्ष ९९ हजार ८८९ पुरूष मतदार, १ लक्ष ८० हजार १७ महिला, इतर ३ असे एकूण तीन लक्ष ७९ हजार ९०९ मतदार आहेत. तर माजलगाव मतदारसंघामध्ये १ लक्ष ८५ हजार ८०६ पुरूष, १ लक्ष ६६ हजार ४७२ महिला, इतर १ असे एकूण ३ लक्ष ५२ हजार २७९ मतदारांनी, बीडमध्ये दोन लक्ष दोन हजार ७२० पुरूष, १ लक्ष ८१ हजार ३७२ महिला व इतर ९ असे एकूण ३ लक्ष ८४ हजार १०१, आष्टीतील दोन लक्ष पाच हजार ३५६ पुरूष, एक लक्ष ८१ हजार एक महिला, इतर १ असे एकूण तीन लक्ष ८६ हजार ३५८, केजमध्ये दोन लक्ष दोन हजार ६२० पुरूष, एक लक्ष ८४ हजार ५९५ महिला, इतर सहा असे एकूण तीन लक्ष ८७ हजार २२१ आणि परळीमध्ये एक लक्ष ७६ हजार ५० पुरूष, एक लक्ष ६१ हजार ९२२ महिला व ४ इतर असे एकूण तीन लक्ष ३७ हजार ९७६ असे एकूण मतदार आहेत.

असे झाले मतदान

गेवराई मतदारसंघात एक लक्ष ४७ हजार १२४ पुरूष, एक लक्ष २९ हजार १५७ महिला, इतर २ असे एकूण दोन लक्ष ७६ हजार २८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तर माजलगाव मतदारसंघात एक लक्ष २६ हजार ५५५ पुरूष, एक लक्ष १० हजार ३२४ महिला, एक इतर असे एकूण २ लक्ष ३६ हजार ८८० मतदारांनी, बीडमध्ये एक लक्ष २८ हजार ३११, बीडमध्ये एक लक्ष १० हजार ५३१, इतर ३ असे एकूण २ लक्ष ३८ हजार ८४५, आष्टीमध्ये १ लक्ष ५२ हजार १७१ पुरुष, १ लक्ष ३० हजार ७५ महिला असे एकूण दोन लक्ष ८२ हजार २४६ मतदारांनी, केजमध्ये एक लक्ष ३० हजार ८५४ पुरूष, एक लक्ष १४ हजार ९४३ महिला आणि इतर २ असे एकूण दोन लक्ष ४५ हजार ७९९ आणि परळी विधानसभा मतदारसंघामध्ये १ लक्ष ३६ हजार १५५ पुरूष, १ लक्ष १८ हजार २२८ महिला असे एकूण २ लक्ष ५४ हजार ३८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

*******

# सत्ताधारी-विरोधकांची धाकधूक वाढली, जे करायचं ते फक्त ४८ तासांत, नाहीतर:, आमदारांची पळवापळवी होणार?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालास अवघे 48 तास उरले आहेत. पण खरा ट्विस्ट तर निकालानंतरच्या 48 तासांमध्ये असणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतरचे पुढचे 48 तास हे महायुती आणि महाविकास आघाडीसाठी जास्त आव्हानाचे असणार आहेत. कारण ज्यांना बहुमत किंवा बहुमताच्या आसपासचा आकडा गाठता येतील, त्यांना सत्ता स्थापनेसाठी फक्त 48 तासांची मुदत असणार आहे. यामध्ये सत्तेच्या ताब्या अपक्षांच्या हाती गेल्या तर महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा ऑफिस पॉलिटिक्स रंगण्याची शक्यता सर्वाधित आहे. 26 नोव्हेंबरच्या रात्री 12 वाजेच्या आत सरकार स्थापनेचा सोपस्कार पार पडला नाही तर 26 नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून महाराष्ट्रात पुन्हा एकदा राष्ट्रपती राजवट लागू होण्याची दाट शक्यता आहे. महाराष्ट्र



विधानसभा निवडणुकीला निकाल हा येत्या 23 तारखेला जाहीर होणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर पुढच्या 48 तासात बहुमत सिद्ध करण्याचं आव्हान महायुती आणि महाविकास आघाडीला असणार आहे. विशेष म्हणजे सत्तेची गणितं पुन्हा एकदा अपक्षांच्या हाती गेली, तर मात्र पुन्हा ऑफिस पॉलिटिक्स रंगण्याची शक्यता आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यासाठी बैठकांमधून रणनीती ठरवण्यास सुरुवात केली आहे. निकालातून कौल अस्पष्ट आल्यास काय होईल?

निकालातून कौल अस्पष्ट आल्यास राज्यपाल पहिल्यांदा सत्ता-स्थापनेचं आमंत्रण कुणाला देतात, हे पाहणं महत्त्वाचं आहे. 26 नोव्हेंबरला रात्री 12 वाजेपर्यंत सरकार स्थापन न झाल्यास 12 नंतर पुन्हा राष्ट्रपती राजवट लागू होण्याची चिन्हं आहेत. तसेच बहुमतासाठी आधी कोण दावा करतं, राज्यपाल आधी कुणाला बोलवतात, हे दोन्ही मुद्दे कळीचे ठरु शकतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २२ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# लिंबागणेश येथे ११ दिवसांच्या मुक्कामानंतर बाळु मामांच्या पालखीचे वैद्यकिन्हीकडे प्रस्थान ; मेंढ्यांची लोकर कात्रण सोहळा

लिंबागणेश:- ( दि.२१ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ११ दिवसांच्या मुक्कामानंतर श्रीसंत बाळु मामांच्या पालखीचे मंगळवारी पुढे वैद्यकिन्हीकडे प्रस्थान झाले. संत बाळु मामांच्या पालखीचे लिंबागणेश येथे दि.९ नोव्हेंबर रोजी आगमन झाले होते. मोठ्या भक्तिभावाने पालखीचे स्वागत लिंबागणेश ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी केले होते. बाळु मामांच्या पालखी सोबत ३ हजार मेंढ्या आहेत.मेंढरांच्या दि.१७ नोव्हेंबर रोजी लोकर कात्रण सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांनी गर्दी केली होती. भाविक भक्तांना पुरणपोळीचा महानैवद्य समर्पित करण्यात आला.

लिंबागणेशसह पंचक्रोशीतील भाविक भक्त रोज सकाळी आरती व रात्री बाळु मामांचे जीवनचरित्र ऐकण्यासाठी उपस्थित रहात होते.लिंबागणेश येथील ११ दिवसांच्या मुक्कामानंतर बाळु मामांच्या पालखीचे मंगळवार रोजी वैद्यकिन्हीकडे प्रस्थान झाले. बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांनी एकादशीच्या दिवशी किर्तन केले.पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी ११ दिवसांमध्ये सकाळ,दुपार, संध्याकाळी अशी आपापल्या परीने सेवा दिली. प्रत्येकाने एक -एक वेळची पंगत दिली.बाळुमामांच्या तळ लिंबागणेश येथील शेतकरी गणपत तागड यांच्या शेतामध्ये




होता.१९ नोव्हेंबर रोजी बाळुमामांना भगवान भालचंद्राचा मानाचा फेटा समर्पित करण्यात आला.यावेळी गणपती देवस्थानचे विश्वस्त व पुजारी श्रीकांत माधव जोशी यांनी बाळु मामांचे यथोचित पुजन केले. भाविक भक्तांच्या उपस्थितीत बाळुमामांची आरती झाली. लिंबागणेशकरांनी बाळु मामांच्या चरण पादुका,बाळुमामांचा रथ यांची लिंबागणेशनगरी प्रदक्षिणा घातली.बळीराजा सुखी व्हावा व संतांच्या शिकवलेल्या मार्गावर सर्व भाविक भक्तांनी चालावे अशी प्रार्थना केली.यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. ढोल ताशांच्या गजरात स्वागत

श्रीसंत सद्गुरू बाळु मामांच्या मेंढ्या आणि पालखी सोहळ्याचे लिंबागणेश येथे ढोल ताशांच्या गजरात आतिषबाजी करत भाविकांनी तर महिला भगिनींनी सडा टाकून रांगोळी काढत मोठ्या उत्साहात स्वागत केले.११ दिवस वेगवेगळे कार्यक्रम झाले.त्यामध्ये दररोज सकाळी ९ वाजता आरती व महाप्रसाद, सायंकाळी ६ ते ७ यावेळेत हरीपाठ आणि सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजता आरती व त्यानंतर महाप्रसाद असे नियोजन पंचक्रोशीतील भाविक भक्तांकडुन करण्यात आले होते.

मेंढ्याची लोकर कात्रण सोहळ्यात १ टन लोकर निघाली

रितीरीवाजाप्रमाणे दि.१६ व १७ नोव्हेंबर शनिवार, रविवार रोजी लोकर कात्रण समारंभ झाला.लोकर कात्रण करण्यासाठी महाराष्ट्रातुन कातरकरी मंडळी सेवा करण्यासाठी आली होती.वर्षातुन फक्त दोन वेळा मेंढ्यांची लोकर कात्रण केली जाते. ते म्हणजे गुढीपाडवा झाल्यानंतर आणि दिवाळी झाल्यानंतर लोकर कात्रण केली जाते.लिंबागणेश येथे मुक्कामी असणा-या ३ हजार मेंढ्यांची लोकर कातरी करण्यात आली.यावेळी १ टन लोकर निघाली. श्रीसंत बाळु मामा पालखी सोहळ्याचे प्रमुख गुरव कारभारी आप्पा माळी म्हणाले की संपूर्ण महाराष्ट्र राज्यात बाळु मामांच्या १९ पालख्या असुन त्यात ३ लाख मेंढ्यांचा समावेश आहे.लिंबागणेश मुक्कामी पालखी नंबर ९ असुन यामध्ये ३ हजार मेंढ्या आहेत.

# मविआचं स्टेअरिंग जयंत पाटील यांच्याकडे? थोरात म्हणाले, आमचा एकही आमदार फुटणार नाही

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानानंतर महाविकास आघाडीत हालचालींना वेग आला आहे. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची आज मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलमध्ये बैठक पार पडली. या बैठकीनंतर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. "आमच्यात महत्त्वाची एकच चर्चा आहे, आम्ही 288 जागांचा आढावा केल्यानंतर महाविकास आघाडीचं सरकार



हे निश्चितपणे आणि सहजपणे बनत असल्याचं आमच्या लक्षात आलं आहे. आम्हाला कोणतीच अडचण येणार नाही, असे स्पष्ट चित्र दिसत आहे. आम्हाला जुळवाजुळवीची देखील आवश्यकता येणार नाही. आमच्याबरोबर कुणी आलं तर आम्ही आनंदच मानतो", असं बाळासाहेब थोरात म्हणाले. अपक्ष आमदारांसोबत चर्चा झालेली आहे का? असा प्रश्न बाळासाहेब थोपात यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी "तशी आवश्यकता नाही, अशी प्रतिक्रिया दिली. आमचं सरकार बनल्यानंतर सर्व येऊन मिळतील. त्यात काही अडचण नाही, असंही थोरात म्हणाले. आमचा नंबर बनला की आम्ही राज्यपालांना लगेच पत्र देऊ", असं थोरात यांनी सांगितलं.

# रावसाहेब मारगुडे यांचे निधन

प्रतिनिधी । माजलगाव दि.20 : माजलगाव तालुक्यातील खानापूर येथील रहीवाशी ह.भ.प. रावसाहेब भाऊराव मारगुडे यांचे बुधवारी रात्री उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यू समयी ते 86 वर्षांचे होते. त्यांच्यावर माजलगाव येथील मंगलनाथ स्मशानभुमीत गुरूवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. रावसाहेब मारगुडे यांना 12 नोव्हेंबर रोजी एका दुचाकीने धडक दिली होती. त्यात त्यांना मार लागला होता. उपचारासाठी त्यांना माजलगाव येथील संजिवनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.



त्यांच्या प्रकृतीत सुधारणाही झाली होती. मात्र बुधवारी रात्री अचानक त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रावसाहेब मारगुडे यांनी अखंडपणे वारकरी सांप्रदायाची सेवा केली. खानापूर गावचे पोलीस पाटील म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम पाहीले. त्यांच्या निधनाने वारकरी सांप्रदायाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. येथील पत्रकार गणेश मारगुडे यांचे ते आजोबा होत. मारगुडे परिवाराच्या दु:खात लोकआरंभ परिवार सहभागी आहे.

# भारती महाडिक यांना हास्यविद्यावाचस्पती उपाधि

पुणे :18 नोव्हेंबर 2024 भारतीय विचारधारा संस्थेच्या संस्थापक आणि अध्यक्ष भारती महाडिक यांना नुकताच डॉ.मधुसूदन घाणेकर विश्वहास्य पीठातर्फे , पहिल्या जागतिक हास्य परिषदेचे अध्यक्ष(2004) सबकुछ सर डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. " भारती महाडिक या सतत हसतमुख राहून राष्ट्रहित आणि आत्मनिर्भर भारत या अंतिम उद्दिष्टाचे भान ठेवून अविरतपणे कार्यरत असतात" असे गौरवोद्गार डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी उपाधि प्रधान करताना काढले. " हसण्यासाठी उपजत मोठे मन लागते, सकारात्मकता- - दुर्दम्य आशावाद त्यातुन साध्य होऊन संपूर्ण आयुष्यच सार्थक ठरल्याचे आत्मिक समाधान मिळते " असे हास्ययोगाचे महत्व सांगुन विरोधाभासातून हास्य कसे खुलते याची मजेशिर व्यवहारिक उदाहरणे देऊन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन मधुरंग इंटरनॅशनल फिल्म.च्या निमंत्रक मधुकर्णिका सारिका सासवडे यांनी केले. " भारतीय जनता पार्टी आणि उच्च आदर्शवादी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन कायम घडत असल्यानेच मी समाज विकासासाठी थोडेफार योगदान करु शकते " या शब्दात सत्काराला उत्तर देताना भारती महाडिक यांनी कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी मधुरंगच्या कार्यध्यक्ष



मंदाताई नाईक, आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या शीळवादक अनघा सावनूर आगाशे, वसुधा इंटरनॅशनलच्या अध्यक्ष वसुधा नाईक, काव्यशिल्प संस्थेच्या माजी अध्यक्ष अपर्णा आंबेडकर, महिला सन्मान संस्थेच्या सचिव दीपाराणी गोसावी, युवा विश्व च्या सचिव सुचेता प्रभुदेसाई यांचीही भाषणे झाली.भारतीय जनता पार्टी-ज्येष्ठ नागरिक आघाडीचे शहर कार्याध्यक्ष श्रीनिवास तेलंग यांनी समारोप केला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि संमोहन तज्ञ सुभाष भागवत यांनी आभार मानले. युवा कार्यकर्त्या माधुरी भागवत यांनी आभार मानले. याच सोहळ्यात डॉ.मधुसूदन घाणेकर संपादित डहाळी अनितकालिकाचा विश्वविक्रमी 598 वा अंक प्रकाशित करण्यात आला.

# जिल्ह्यात सहा केंद्रीय मतमोजणी निरीक्षक



बीड, दिनांक 22 : जिल्ह्यातील सहाही मतदार संघासाठी केंद्रीय मतमोजणी निरीक्षक यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोग यांनी केली आहे. त्यानुसार गेवराईसाठी लालटनपुई वॉनचाँग (मणिपूर ), माजलगावसाठी मनोज कुमार (बिहार), बीडसाठी विजयकुमार जयरामन (कर्नाटक), आष्टीसाठी श्रीमती पूजा अग्निहोत्री (उत्तर प्रदेश), केजसाठी सुनील अंचिपका (गोवा) आणि परळीसाठी श्रीमती ईला तिवारी (मध्य प्रदेश) केंद्रीय मतमोजणी निरीक्षक असतील.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांच्या दालनात पूजा अग्निहोत्री यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्सगी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते.

# परळी मतदारसंघाची निवडणूक रद्द करून निर्भय वातावरणात लोकशाही पद्धतीने फेर निवडणूक घ्या - राजेभाऊ फड

## परळी विधानसभा मतदार संघात ३६३ पैकी ३१३ बुथवर बोगस मतदान

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राज्यातील सर्वाधिक लक्ष लागून असलेल्या परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील राजकारणाने अतिशय घाणेरडी पातळी गाठली असून, गुंडगिरी, दादागिरी आणि बोगसगिरीचा कळस गाठला आहे. मतदानाच्या दिवशी याचा सर्वांना प्रत्यय आला. मतदारसंघातील अनेक बुथवर त्यांच्या कार्यकर्त्यांनी कब्जा मिळवून बोगस मतदान करवून घेतले. झालेला हा प्रकार लोकशाहीची हत्या करणारा प्रकार असून परळी विधानसभा मतदारसंघाची निवडणूक रद्द करावी आणि फेर मतदान घेण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी निवडणूक आयोगाला केली आहे. काही लोकांनी बीड जिल्ह्याचा बिहार



करून टाकला आहे. गुंडगिरी, दादागिरी, दडपशाहीच्या प्रकाराला सर्रास प्रोत्साहन दिले जात असून, प्रशासनाला हाताशी धरून अवैध प्रकार घडवून आणले जातात. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी परळी विधानसभा मतदारसंघातील एकूण मतदान केंद्रांपैकी जवळपास 300 ते 313 बूथ काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी ताब्यात घेऊन बोगस मतदान केले आहे. मतदारांना धमक्या देऊन त्यांच्या हाताला फक्त शाई लाऊन परत पाठवले गेले. काही मोजकेच कार्यकर्ते सगळ्या गावाचे मतदान करत असल्याचे दिसून आले. विरोधी पक्षातील उमेदवारांना शिवीगाळ करण्यात आली, काही ठिकाणी प्रमुख कार्यकर्त्यांना मारहाण केली. परळी विधानसभा मतदारसंघात काही नेत्यांनी लोकशाहीची हत्या केली आहे. लोकसभेच्या मतदानाच्या वेळी परळी मतदारसंघातील जवळपास 122 बुथवर बोगस मतदान करण्यात आले होते. ही बाब निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून देऊन यावर मुंबई उच्च न्यायालयात आम्ही जनहित याचिका केली होती. यावर निवडणूक आयोगाने न्यायालयाला शपथपत्र देऊनही योग्य त्या उपाययोजना केल्या नाहीत. प्रशासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना हाताशी धरून मतदारसंघातील सर्वच मतदान बुथवर बोगस मतदान केल्याने ही निवडणूक प्रक्रिया चुकीची असल्याने रद्द करण्यात यावी व संपूर्ण परळी मतदारसंघात निर्भय वातावरणात व लोकशाही पद्धतीने निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी निवडणूक आयोगाला केली आहे. याचबरोबर याबाबत न्यायालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे

अनेक ठिकाणी सीसीटिव्ही बंद पाडले!


लोकसभा निवडणुकीत झाले तसे बोगस मतदान करण्याचे प्रकार घडू नयेत यासाठी परळी विधानसभा मतदारसंघात बुथवर सीसीटिव्ही यंत्रणा बसवण्यात आली होती. मात्र ज्या ठिकाणी बोगस मतदानाचे प्रकार घडले त्या ठिकाणी बसवण्यात आलेल्या सीसीटिव्ही यंत्रणेचे वायर कापण्याचे प्रकार घडले आहेत. असे प्रकार घडत असताना तिथे लावण्यात आलेली सुरक्षा यंत्रणा काय करत होती? प्रशासकीय यंत्रणेने याला वेळीच आक्षेप का घेतला नाही? असा सवाल निर्माण होत असल्याचेही राजेभाऊ फड म्हणाले. झालेल्या प्रकारची सखोल आणि निपक्षपातीपणे चौकशी व्हायला हवी असेही त्यांनी म्हटले आहे

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २२ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# सरणावरती पती, घरात दुःखाचा आराडा, महिलेने जे केलं त्याने बीड हादरलं

कोणतंही कारण असो, आत्महत्या हा त्यावर पर्याय असूच शकत नाही. खरंतर मृत्यू हे अंतिम सत्य आहे. पण आत्महत्या करणं अतिशय चूक आहे. आपल्या जवळच्या व्यक्तीचं अकाली निधन झालं म्हणून आपणदेखील तसा टोकाचा निर्णय घेणं असा विचार करणं अतिशय चूक आहे. संकट हे सांगून येत नाही. ते येतं. नियतीचा भोग म्हणून अशा संकटाला सामोरं जाण्याशिवाय आपल्याकडे दुसरा पर्याय नसतो. त्यामुळे अशा संकट काळात संयमाने



परिस्थिताला सामोरं जाणं अपेक्षित आहे. पण काही जण संयम सोडून आत्महत्या सारखा टोकाचा निर्णय घेतात. बीड जिल्ह्यातदेखील अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. बीड जिल्हा एका धक्कादायक घटनेने हादरलं आहे. शिक्षक पतीच्या निधनानंतर पत्नीने विषारी औषध पिवून स्वत:ची जीवनयात्रा संपवली आहे. शिरूर कासार तालुक्यातील खामकरवाडी येथे ही घटना आहे. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. शिरूर कासार तालुक्यातील खामकर वाडी येथील जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत असलेल्या शिक्षकाचा पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली होती. घटनेच्या काही तासातच त्यांच्या पत्नीने विषारी औषध प्राशन करून पती पाठोपाठ आपला जीवन प्रवास थांबवला या घटनेनंतर तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. खामकरवाडी येथील शिक्षक कन्हैया लाल खामकर (वय 52 वर्ष) हे तालुक्यातील आर्वी केंद्रांतर्गत असलेल्या शिंदे वस्ती शाळेवर शिक्षक म्हणून कार्य करीत होते. त्यांना आज (21 नोव्हेंबर, वार-गुरुवार) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराचा झटका आला. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचा शोक कुटुंब व्यक्त करीत असतानाच त्यांच्या पत्नी राहीबाई कन्हैयालाल खामकर (वय 45 वर्ष) यांनी पुढील काही वेळातच विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. त्यांचा मृतदेह शिरूर येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला आहे.

# धुळ्यात दहा हजार किलो चांदी जप्त, मालकाची माहिती आली समोर




महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे मतदान बुधवारी झाले. मतदानाच्या दिवशी धुळ्यात मोठी घडामोड घडली आहे. पोलिसांनी अचारसंहितेमुळे सर्व वाहनांची तपासणी सुरु केली होती. त्यावेळीस एक कंटेनर अडवला. त्या कंटेनरची तपासणी केल्यावर त्यात दहा हजार किलो चांदी मिळाली. ही चांदी ९४ कोटी ६८ लाख रुपायांची आहे. पोलिसांना या चांदीचा मालक कोण? चांदी कुठून कुठे जात होती? त्याची माहिती मिळाली आहे. नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रेय कराले यांनी याबाबतची माहिती दिली. चांदीच्या विटा निघाल्या बँकेच्या

धुळे पोलिसांच्या तपासणीत दहा हजार किलो चांदीच्या विटा मिळाल्या. ही चांदी एचडीएफसी बँकेचे असल्याची माहिती पोलिसांनी दिली. थाळनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोलिसांकडून नियमित तपासणी होत होती. यावेली पोलिसांनी एका कंटनेरला अडवले. हा कंटनेर चेन्नईहून जयपूरकडे जात होता. परंतु त्यांच्याकडे कागदपत्रे नव्हती. त्यामुळे पोलिसांनी ती जप्त केली. तसेच त्याची माहिती आयकर विभागाला दिली. कागदपत्रे मिळाल्यावर ही चांदी परत देण्यात येणार आहे.

चांदीची रक्कम वेगळता धुळे जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता एकूण नऊ कोटी अकरा लाख तीस हजार रुपयाची रोकड जप्त करण्यात आली. तसेच अमली पदार्थ आयुर्वेद दारू साठा आणि सोने चांदीचे दागिने जप्त केले. एकूण 19 कोटी 50 लाख 56 हजार 937 रुपयांची बेकायदा मालमत्ता जप्त करण्यात आली. राज्यात ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमुळे १५ ऑक्टोबरपासून पोलीस आणि निवडणूक आयोगाच्या पथकाकडून ठिकठिकाणी तपासणी केली जात आहे. राज्यात १५ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २०२४ दरम्यान मोठ्या प्रमाणावर रोकड, सोने, चांदी, मद्य आणि अंमलपदार्थांचा साठा मिळून आला. विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.



लोकशाही बळकट करण्यासाठी विधानसभा निवडणूक मतदान हक्क बजावताना युवक



233-परळी विधानसभा मतदारसंघ पोहनेर: मतदारांच्या लहान बाळांची व्यवस्था करण्यासाठी पाळणाघराची सुंदर उभारणी

# 'महाराष्ट्रात परिस्थिती पाहता प्रहारचा मुख्यमंत्री होऊ शकतो', बच्चू कडू यांचं मोठं वक्तव्य

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानानंतर समोर झालेल्या एक्झिट पोलनुसार, महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात सत्ता स्थापनेसाठी काँटे की टक्कर बघायला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकीत छोटे पक्ष आणि अपक्ष हे या निवडणुकीत किंगमेकर ठरण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून अपक्ष आणि बंडखोर उमेदवारांसोबत बोलणी सुरु झाल्याची चर्चा सूत्रांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे या



वेळची निवडणूक फार वेगळी आहे. कारण निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात सरकार स्थापनेसाठी राजकीय पक्षांना केवळ 48 तासांची मुदत असणार आहे. या 48 तासांत सरकार स्थापन नाही झालं तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता आहे. या घडामोडी पाहता राज्यात पुन्हा ऑफिस पॉलिटिक्स घडू शकतं. या सर्व धामधुमीत प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी सत्ता स्थापनेबाबत मोठा दावा केला आहे. राज्यात परिस्थितीनुसार प्रहारचा मुख्यमंत्रीदेखील बनू शकतो, असं मोठं वक्तव्य बच्चू कडू यांनी केलं आहे.

# सुरेश धस यांच्या कामाची पावती सर्वसामान्य जनता मतदानरुपी देणार



पाटोदा प्रतिनिधी मतदारसंघांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून माजी मंत्री सुरेश धस जनतेच्या कामाला पडत असून सर्वसामान्य जनता आता विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी राहिली असल्याचे चित्र जाणवत आहे व. सुरेश धस यांनी प्रचारातही आघाडी घेतल्याने कमळ विजयाच्या वाटेवर असल्याचे दिसून येत आहे. २३१ आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टी, शिवसेना, रिपाई (आठवले गट, व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस याच अनुक्रम ३ असून चिन्ह कमळ आहे. जातीपातीचं राजकारण न करता माणुसकी हीच जात आणि धर्म समजून राजकीय प्रवास करीत आहेत. आजवर मोठ्या प्रमाणावर

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com